# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 15 January 2025
## Time 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १५ जानेवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबई दौऱ्यावर, नौदलाच्या तीन युद्धनौकांचं जलावतरण.
- पानिपत स्मारकासाठी महाराष्ट्र सरकार आवश्यक भूसंपादन करणार – मुख्यमंत्र्यांची घोषणा.
- छत्रपती संभाजीनगर इथल्या पाणचक्की तसंच दरवाजांचं चित्र असलेल्या टपाल तिकीटांचं प्रकाशन.
- खंडणीप्रकरणी अटकेत असलेल्या वाल्मिक कराडवर मकोका लागू.

आणि

- दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांच्या उपस्थितीत आज उद्घाटन.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबई दौऱ्यावर येत आहेत. मुंबई इथं नौदलातील आयएनएस सूरत, आयएनएस नीलगिरी आणि आयएनएस वागशीर या तीन लढाऊ जहाजांचं जलावतरण त्यांच्या उपस्थितीत होणार आहे. नवी मुंबईत खारघर इथल्या श्री श्री राधा मदनमोहनजी या इस्कॉन मंदिराचं उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

****

पानिपत इथं १४ जानेवारी १७६१ रोजी अहमदशहा अब्दालीच्या विरोधातल्या लढाईत मराठ्यांनी गाजवलेल्या शौर्याचं स्मारक उभारण्यासाठी आवश्यक भूसंपादन महाराष्ट्र राज्य सरकार करेल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली

आहे. ते काल पानिपत इथं झालेल्या कार्यक्रमात बोलत होते. पुढच्या वर्षापासून महाराष्ट्र राज्य सरकारही या स्मृती सोहळ्याच्या आयोजनात सहभागी होणार असल्याचं, फडणवीस यांनी सांगितलं. ते म्हणाले...

***आज ये आश्वासित करना चाहता हूं, आनेवाले दशकों दशकों तक यहां पर कार्यक्रम आयोजित करने के लिये केवल शौर्य स्मारक ट्रस्ट नही होगा। महाराष्ट्र की सरकार ही आपके साथ में इस कार्यक्रम का आयोजन करेगी। और यहां पर जिस जमीन का अधीग्रहण करना है, इस स्मारक के विस्तार के लिये इसका अधिग्रहण महाराष्ट्र की सरकार पैसे देकर करेगी। छत्रपति शिवाजी महाराज की प्रतिमा भी इस भूमि में होनी चाहिये. इसके लिए भी हम महाराष्ट्र सरकार की और से जो भी करना पडे वो करेंगे।***

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या ऐतिहासिक पाणचक्की आणि दरवाजांचे चित्र असलेल्या टपाल तिकीटांचं काल खासदार भागवत कराड यांच्या हस्ते प्रकाशन झालं. छत्रपती संभाजीनगर इथल्या एमजीएम विद्यापीठात झालेल्या या कार्यक्रमात, पारपत्राची सुविधा शहरातल्या टपाल कार्यालयाद्वारे देण्यात यावी अशी अपेक्षाही कराड यांनी व्यक्त केली. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. देशभरातल्या टपाल कार्यालयात सर्वप्रथम छत्रपती संभाजीनगर इथल्या कार्यालयाला ई - सायकल प्राप्त झाल्या आहेत, विभागाचे दोन कर्मचारी "डाक सेवा जनसेवा" या संकल्पनेद्वारे या सायकलवर विविध शहरांमध्ये प्रवास करून मुंबईला पोहोचणार आहेत. या ई - सायकल रॅली ला कराड यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवण्यात आला.

****

राज्यातल्या खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व कंपन्यांना एकाच नियमावलीअंतर्गत आणणार असल्याचं, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितलं आहे. यासंदर्भात काल मंत्रालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. एस. टी. कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात २५ तर मुंबईत बोरिवली इथं १०० खाटांचं रूग्णालय सुरू करण्यात येणार असून, या रुग्णालयात महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून उपचार करण्यात येतील अशी माहिती सरनाईक यांनी दिली.

****

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ३१ वा नामविस्तार काल विविध कार्यक्रमांनी साजरा झाला. नामांतराचा लढा ही भारतात शिक्षणासाठी झालेली पहिली सामाजिक परिवर्तनाची चळवळ असून, बाबासाहेब हेच या चळवळीचे प्रेरणास्रोत असल्याचं प्रतिपादन नाशिकच्या डॉ बी आर आंबेडकर एस सी, एसटी महासंघाच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ. इंदिरा आठवले यांनी केलं. 'नामविस्तारानंतरची आव्हाने' या विषयावर काल विद्यापीठातल्या विशेष व्याख्यानात त्या बोलत होत्या.

****

दरम्यान, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्यासह अनेक मान्यवरांनी काल विद्यापीठ परिसरात बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन केलं. डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या धाराशिव उपपरिसरात नामविस्तार दिन साजरा करण्यात आला.

****

अवादा एनर्जी या कंपनीला दोन कोटी रुपयांची खंडणी मागितल्या प्रकरणी अटकेत असलेल्या वाल्मिक कराड यांना केज न्यायालयाने चौदा दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. कराड यांच्या सीआयडी कोठडीची मुदत संपल्यानं, त्यांना काल न्यायालयात हजर करण्यात आलं, त्यावेळी न्यायालयानं संतोष देशमुख हत्या प्रकरणी कराडचा ताबा विशेष तपास पथक- एस आय टी कडे सोपवण्याचे निर्देश दिले.

वाल्मिक कराड याच्याविरोधात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा मकोका लागू करण्यात आला आहे, प्रोडक्शन वॉरंट दाखवून एस आय टी कराड याचा ताबा घेईल अशी माहिती सीआयडीचे पोलीस उपअधिक्षक अनिल गुजर यांनी दिली. कराड यास जिल्हा कारागृहात ठेवण्यासाठी काल सायंकाळी बीड इथं आणलं असता, त्याच्या छातीमध्ये अचानक कळ येऊन वेदना सुरू झाल्याने त्यास जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं.

दरम्यान, कराड समर्थकांनी काल परळीत आत्मदहनाचा प्रयत्न केला, पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं. जिल्ह्यात इतरत्रही कराड समर्थकांनी काल आंदोलन केल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे...

***संतोष देशमुख हत्येप्रकरणी दोषींवर कारवाई व्हावी या मागणीसाठी बीड जिल्ह्यासह विविध जिल्ह्यामध्ये आंदोलन सुरु आहेत. या***

***आंदोलनामुळे बीड जिल्हा राज्यभर चर्चेत आहे. आता खंडणी प्रकरणी कोठडीत असलेले वाल्मीक कराड यांच्या समर्थकांनी सुद्धा आंदोलन सुरु केले आहे. वाल्मीक कराड यांच्या मातोश्री पारुबाई कराड यांनी परळी शहर पोलीस ठाण्यासमोर आंदोलन सुरु केले आहे. त्याचबरोबर परळी शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या टावर चढून देखील कराड समर्थकांनी आंदोलन केली आहेत. तसेच परळी तालुक्यातील पांगरी नदी पुलाजवळ टायर जाळून रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. याप्रंसगी जिल्हाप्रशाकडून जिल्हाभरामध्ये जमावबंदी आदेश लागू करण्यात आले आहे. रवी उबाळे, बीड.***

परळी ते कवडगाव कानडी एसटी बसवर काल सायंकाळी दगडफेक झाल्याचं वृत्त आहे. त्यामुळे परळी बस स्थानकामधून सुटणाऱ्या बस काल सायंकाळनंतर थांबवण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं सांगितलं.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आज दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं उद्घाटन केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांच्या उपस्थितीत होणार आहे. एमजीएम विद्यापीठाच्या रूक्मीणी सभागृहात होणाऱ्या या उद्घाटन सोहळ्यात यंदाचा पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ लेखिका, नाटककार, निर्मात्या सई परांजपे यांना प्रदान करण्यात येणार आहे. या उद्घाटन सोहळ्याआधी भारतीय सिनेसृष्टीचे संस्थापक दादासाहेब फाळके यांनी १०५ वर्षांपूर्वी दिग्दर्शित केलेला प्रसिद्ध मुकपट कालिया मर्दन चं विशेष प्रदर्शन होणार आहे. तर रात्री नऊ वाजता आयनॉक्स, प्रोझोन मॉल इथं लिटील जाफना ओपनिंग फिल्म म्हणून प्रदर्शित केली जाणार आहे.

****

सूर्याचा मकर राशीत प्रवेश तसंच दक्षिणायनातून उत्तरायणात संक्रमणाचं पर्व, मकरसंक्रांतीचा सण काल साजरा झाला. कालपासून सर्वत्र संक्रांतीनिमित्तानं स्नेहमिलन कार्यक्रमांना प्रारंभ झाला.

मकर संक्रांतीच्या पुण्य पर्व काळात प्रयागराज इथं महाकुंभमेळ्यात काल अमृत स्नान सोहळा साजरा झाला. विविध १३ आखाड्यांचे प्रमुख संत-महंत आणि त्यांच्या असंख्य शिष्यगणांनी, साधुंनी त्रिवेणी संगमावर अमृत स्नान केलं. सुमारे

साडे तीन कोटींहून अधिक भाविकांनी काल पवित्र संगमावर स्नान केल्याचं वृत्त आहे.

****

कुंभ मेळ्यासाठी देवगिरी प्रांतातून सुमारे शंभर साधू रवाना झाल्याची माहिती विश्व हिंदू परिषदेच्या देवगिरी प्रांताचे अध्यक्ष संजय बारगजे यांनी दिली. कुंभ मेळ्याबाबत दिलेल्या विशेष मुलाखतीत ते बोलत होते...

> ***सगळ्या जातीचे, सगळ्या संप्रदायाचे सर्व लोक एकत्र येऊन एका ठिकाणी स्नान करणं, याच्यासारखी जगात मोठी समरसता कुठेच नाही. सगळे भारतातील संप्रदाय त्या तिथे स्नानाला येतात. आपल्या देवगिरी प्रांतातून विविध संप्रदायाचे शंभर साधू यावेळी जाणार आहेत. आपण देवगिरी प्रांतातर्फे भगवे वस्त्र दोन हजार साधुंना तिथे प्रदान करणार आहोत.***

बारगजे यांची ही मुलाखत आज सकाळी दहा वाजून ४५ मिनिटांनी आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरुन प्रसारित होणाऱ्या प्रासंगिक कार्यक्रमात आपण ऐकू शकता.

****

शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याचे निर्देश वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष निलेश हेलोंडे पाटील यांनी दिले आहेत. काल जालना जिल्हाधिकारी कार्यालयात विविध विभागांचा आढावा घेतल्यानंतर ते बोलत होते.

****

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्यात एक लाख २० हजार पात्र लाभार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी पूर्ण झाली आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले यांनी ही माहिती दिली. ऑनलाइन नोंदणी झालेल्या पात्र लाभार्थ्यांना लवकरच उद्दिष्टानुसार मंजुरी देण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

लॉयन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर चिकलठाणा, यांच्या मोफत प्लास्टिक सर्जरी शिबीराचा काल समारोप झाला. चार दिवस चाललेल्या या शिबीरात सुमारे दीडशे शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

****

खो-खो विश्वचषक स्पर्धेत काल भारतीय महिला आणि पुरुष संघांनी विजय संपादन केला. पुरुष संघानं ब्राझीलचा ६४ - ३४ असा, तर महिला संघाने दक्षिण कोरियाचा १७५ - १८ अशा मोठ्या गुण फरकाने पराभव केला.

****